## अर्थ प्रशासन विभाग
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

---

जाक/अप्रवि/असेनियो/ ११८८ /२०१९ दिनांक: ११ /०६ /२०१९

स्मरण पत्र कं. ४

कालमर्यादा/अत्यंत महत्त्वाचे

### परिपत्रक

संदर्भ:–1) शासन निर्णय कं. वित्त विभाग, अंनियो–2012/प्र.कं.96/सेवा 4/दि. 21/08/2014
2)शासन निर्णय कं. वित्त विभाग, अंनियो–2015/प्र.कं.32/सेवा 4/दि. 06/04/2015
3)N.S.D.L. e-Governance Infrastructure Limited, N.S.D.L. C.R.A. /PO&RI/FC /2018/003 Dated 25.06.2018
4)या कार्यालयाचे परिपत्रक कं. अप्रवि/असेनियो/398/2018 दि. 29/06/2018
5)या कार्यालयाचे परिपत्रक कं. अप्रवि/असेनियो/489/2018 दि. 10/07/2018
6)या कार्यालयाचे परिपत्रक कं. अप्रवि/असेनियो/588/2018 दि. 24/07/2018
7)या कार्यालयाचे परिपत्रक कं. अप्रवि/असेनियो/740/2018 दि. 10/08/2018

संदर्भ कं. 1 येथे नमुद शासन निर्णयानुसार राज्य शासनाने कृषि विद्यापीठे व विद्यापीठाशी संलग्न असलेल्या शासन मान्य अनुदानित कृषि महाविद्यालये व कृषि शाळा यांच्या सेवेत दि. 1 नोव्हेंबर, 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या/होणा–या कर्मचा–यांसाठी केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेत (NPS) सामील होण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

संदर्भ कं. 2 मध्ये नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेत समाविष्ट होण्यासंदर्भात स्पष्टीकरण व संबंधित विभागांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत माहिती देण्यात आली होती. तसेच राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेअंतर्गत सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कायम निवृत्ती वेतन लेखा कमांक देण्याची जबाबदारी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांना देण्यात आली आहे.

संदर्भ कं. 3 नुसार P.F.R.D.A. (Pension Fund Regulatory and Development Authority) ने राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेचे New C.S.R.F. Version 1.2 या अद्ययावत आवृत्तीमध्ये माहिती भरण्याचे निर्देशित केले आहे. या कार्यालयाने संदर्भ कं. 4, 5, 6, व 7 च्या परिपत्रकाद्वारे व वेळोवेळी केलेल्या तोंडी सुचनेनुसार तसेच दुरध्वनीद्वारे संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना विहीत नमुन्यात माहिती दिलेल्या मुदतीपर्यंत सादर करण्याचे सुचित केले होते. परंतु ब–याच कार्यालयांकडून विहित नमुन्यात माहिती या कार्यालयास अप्राप्त आहे. तसेच असेही निदर्शनास आले आहे की, या कार्यालयास प्राप्त होणारे विहित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेचे Forms **New C.S.R.F. Version 1.2 Forms काळी शाईऐवजी निळया शाईच्या पेनाने भरून पाठवितात** व सदर Forms सोबत **पॅन कार्ड, आधार कार्ड, व बॅक पासबुक इत्यादींच्या झेरॉक्स प्रतिंवर संबंधित**

कर्मचा–यांकडून सांक्षाकीत न करता तसेच बॅक पासबुक छायाप्रतींवर I.F.S.C Code No. पुर्ण अंकी खाते कमांक व इतर ब–याच त्रुटयांसह या कार्यालयास सादर करतात. त्रुटयांची पुर्नरावृत्ती होवू नये म्हणुन तपाससुचींची यादी (Check List) संबंधित कार्यालयास पाठविण्यात आली आहे व तोंडी सुचनेद्वारेही वारंवार कळविण्यात आले आहे. असे असतांना देखील ब–याच विभागांकडून अद्यापही संबंधित्त फॉर्मस् या कार्यालयास अप्राप्त आहेत. त्यामुळे विद्यापीठामध्ये नविन परिभाषित्त अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेत समाविष्ट होणाच्या कार्यवाहीमध्ये अडचण निर्माण झालेली आहे.

करीता विद्यापीठाअंतर्गत सर्व विभाग/कार्यालये/संशोधन केंद्रे/महाविद्यालये/शेतकी शाळा/संलग्न अनुदानित संस्था यांना कळविण्यात येते की, उपरोक्त दिलेल्या सुचनांचे पालन करून आपल्या आस्थापनेवरिल कार्यरत असलेल्या नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे सभासद असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची माहिती दिलेल्या सुचनेप्रमाणे विहित नमुन्यात (National Pension System (NPS) Subscriber Registration Form) भरून 02 प्रतिंत या कार्यालयास दिनांक 25 जुन, 2019 पर्यंत सादर करावे. सदर प्रकरणाची पुर्तता प्रथम प्राधान्याने करण्यात यावी. उपरोक्त दिनांकापर्यंत संबंधित अर्ज या कार्यालयास सादर न केल्यास सदर प्रकरणी मा. कुलगुरू महोदय यांन. सहआदर कळविण्यात येईल, तसेच मा. कुलगुरू महोदय यांचे पुर्वसंमतीने संबंधित विभाग/कार्यालये/संशोधन केंद्रे/महाविद्यालये/शेतकी शाळा/संलग्न अनुदानित संस्था यांचे कुठलेही देयके या कार्यालयाकडून पारीत करण्यात येणार नाही. सदर दिनांकानंतर राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेबाबत कुठलेही अधिकारी/कर्मचारी वंचित राहिल्यास सदर बाबतची संपुर्ण जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.

प्रतिलीपीः–

1. नियंत्रक अधिकारी/विभाग प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी (सर्व)
2. मा. कुलगरूंचे तांत्रिक सचिव, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना मा. कुलगुरूंचे माहितीकरिता सादर

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.